Indian Streams Research Journal
Volume 2, Issue.12,Jan. 2013
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# *मराठी प्रवासवर्णनाचे स्वरूप आणि वाटचाल*

*संदीप सांगळे*

मराठी विभाग प्रमुख
साहेबराव शंकरराव ढमढेरे महाविद्यालय तळेगाव ढमढेरे, ता. शिरूर. जि. पुणे

*सारांश*

प्रवासवर्णन हा मुलतः निबंधाच्या जातकुळीचा वाड्मयप्रकार होय. केलेल्या प्रवासात आलेल्या अनुभवांची निबंधनात्मक पध्दतीने घेतलेली काहीशी चिंतनशील नोंद, तसेच पाहिलेल्या महत्वाच्या स्थळांची वर्णने व विश्लेषण, घटना प्रसंगांची विशेषत्वाने घेतलेली नोंद म्हणजे प्रवासवर्णन होय. आजच्या परिस्थितीत, वाड्मयीन वाटचालीत प्रवासवर्णनाचे स्वरूप फारच पालटलेले दिसते. प्रगल्भतेच्या दिशेने प्रवासवर्णनाची वाटचाल जोमाने सुरू आहे. ललितगद्य या वाड्मय प्रकारात प्रवासवर्णन या साहित्य प्रकाराने प्रवेश केल्याचे दिसते. इंग्रजी साहित्यातून हा वाड्मयप्रकार मराठीत आला आहे. प्रवासवर्णन हा वाड्मयप्रकार जसा आत्मनिश्ठ तसाच तो वस्तुनिष्ठ स्वरूपाचा आहे. कारण प्रवासवर्णनाची निर्मिती करणाना प्रवासवर्णनकार पून्हा कल्पनेने प्रवास अनुभवतो. त्या प्रवासाचा पुनर्शोध घेतो आणि प्रथमपुरूशी निवेदन पध्दतीने त्याची मांडणी करतो. पत्रे, दैनंदिनी, बातमीपत्रे अशा रूपांचा तो वापर करतो.

## *प्रस्तावना*

प्रवासवर्णन हे तत्कालिन परिस्थितीची मांडणी करते म्हणून ते अभ्यासाचे प्रभावी असे साधन ठरू शकते. प्रवासवर्णनात जर प्रवासीच नसेल तर प्रवासवर्णनाला 'प्रवासवर्णन' म्हणून अस्तित्वच राहणार नाही. म्हणूनच प्रवासी व त्याचे अनुभव घटक या वाड्मयप्रकाराचे अविभाज्य घटक असतात. अनुभव एकाचा व कथन दुसऱ्याचे असे प्रवासवर्णनात अपेक्षित नाही. लेखक प्रवासवर्णनामध्ये 'मी' च्या भुमिकेतून आपले अनुभव व्यक्त करतो. प्रवासवर्णनाची निर्मिती करणारा लेखक हा नुसता लेखक नसतो तर तो 'प्रवासी लेखक' असतो. संस्कृती, समृध्द लोकपरंपरा, लोकजीवन आणि विविधतेने नटलेलया आपल्या देशाचे दर्शन मराठीमध्ये विविध प्रवासवर्णनकारांनी अत्यंत सुंदरपणे शब्दबध्द केले आहे. म्हणून मराठी प्रवासवर्णनाची वाटचालही उज्वल परंपरेने नटलेली असून समृध्दतेने मार्गक्रमण करीत आहे. एक लोकप्रिय वाड्मयप्रकार म्हणून वाचकांच्या पसंतीस मराठीतील अनेक प्रवासवर्णने उतरलेली दिसतात. अर्वाचीन कालखंडात प्रवासवर्णन हा वाड्मयप्रकार बहरलेला दिसतो.

### *मराठी प्रवासवर्णनाची समृध्द वाटचाल :–*

खरे तर मराठीमध्ये प्रवासवर्णन हा वाड्मयप्रकार तसा नवा नाही. प्राचीन काळापासून अनेकांचा वेगवेगळया पध्दतीने, विभिन्न तऱ्हेने प्रवास चालू आहे. अनेकांनी देशाटने केली, अनेकजन तिर्थयात्रांच्या निमित्ताने वेगवेगळया ठिकाणांना भेटी देतात. अनेकांनी धर्मप्रचार आणि प्रसाराच्या निमित्ताने तिर्थाटने केली व त्यांचे अनुभव विभिन्नतेने त्यांनी आपापल्या पध्दतीने शब्दबध्द केले. हे शब्दबध्दतेचे रूप म्हणजे प्रवासवर्णने होत हेही आपल्याला लक्षात घ्यायला हवे. महानुभव पंथातील ऋृध्दिपूरवर्णन, नामदेवांनी लिहिलेली तिर्थावळी यातुनही स्थळांचे वर्णन, महात्म्य आणि वैशिष्टये साकारलेली दिसतात. परदेशातील प्रवासाविषयी अनेकांच्या मनात उत्सुकता असते. परदेशातील भाषा, तेथील लोकसंस्कृती, रूढीपंरपरा, चालीरिती, आचारविचार, राज्यकारभार, भौगोलिक विविधता, ऐतिहासिक वारसा इत्यादींविषयी आपल्या मनात प्रचंड उत्सुकता असते. परदेशातील जीवन आणि येथील विविध अंतर्गत गोष्टी जाणुन घेण्यासाठी आपले मन आतुरलेले असते. म्हणूनच इंगजी भाषेतील अनेक प्रवासवर्णने मराठीत भाषांतरीत झालेली आहेत. त्या प्रवासवर्णनांना जाणुन घेणे, व त्यातुन प्रेरणा घेऊन अनेकांना मराठीतील प्रवासवर्णनाची रचना केल्याचे जाणवते. इ.स. 1835 मध्ये नाना नारायण यांनी 'इंग्लंड देशाचे वर्णन' याचे मराठीत भाषांतर केले. त्यानंतर शामराव मोरोजी, गणपत पितळे, भास्कर भागवत या लेखकांनी प्रारंभी प्रवासवर्णने लिहिलेली आहेत.

इ.स. 1852 मध्ये 'काशीप्रवास', 'नाथाचे प्रवासवर्णन' स्वतंत्रपणे शामराव मोरोजी यांनी लिहिले. म्हणून 'मराठी भाशेतील पहिले प्रवासवर्णन' हा मान या प्रवासवर्णनाला दिला जातो. प्रा.गं.बा. सरदार यांनी या प्रवासवर्णनाला मराठीतील पहिले प्रवासवर्णन म्हटले असले तरी त्यात वाड्मयीन सौंदर्याचा अभाव आहे. असा अभिप्रायही ते देतात. काशी, गया, अयोध्या यांसारख्या तिर्थस्थळांचा आढावा प्रामुख्याने या ग्रंथात घेतलेला आहे. मराठीतील वाड्मयीन गुणांनी श्रेश्ठ असलेले प्रवासवर्णन म्हणून गोडसे भटजी यांच्या 'माझा प्रवास' याकडे पहिले जाते. इ.स. 1883 साली गोडसे भटजींनी या प्रवासवर्णनाची निर्मिती केली. 1957 च्या बंडाची हकिगत यामध्ये दिली आहे. इ.स. 1883 मध्ये पंडीता रमाबाई यांनी 'इंग्लडचा प्रवास' नावाचे प्रवासवर्णन लिहिले. म्हणून मराठीतील पहिल्या प्रवास लेखिकेचा मान त्यांना मिळाला. याच काळात रा. भ. पावगी, रामराव कोठारे, बळवंत टिळक, गोविंद जोशी यांनी प्रवासवर्णने लिहून मराठी प्रवासवर्णनाचा प्रांत सक्षम करण्यास मोलाचा हातभार लावला.

19 व्या शतकाच्या प्रारंभी रामचंद्र माने, साळुबाई कलभंडे, यादव वावीकर यांनी लिहिलेली प्रवासवर्णने लोकप्रिय ठरली, या नंतरच्या काळात गो. चि. केळकर, चिं.के.सुकर, श्री. रा. टीकेकर, अनंत कालेकर, रा. भि. जोशी, गंगाधर गाडगीळ, पु. ल. देशपांडे, प्रभाकर पाध्ये यांच्या प्रवासवर्णनानी खऱ्या अर्थाने मराठी प्रवासवर्णनांचा प्रांत समृध्द केला. 1920 नंतरच्या कालखंडात काकासाहेब कालेलकर यांची 'हिमालयाचा प्रवास', 'लोकमाता', 'आमच्या देवाचे दर्शन', 'लाटांचे तांडव', 'भक्ती कुसुमे' इत्यादी प्रवासवर्णनात्मक ग्रंथ होत. अनंत कालेकर यांचे 1943 साली 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे' हे प्रवासवर्णन प्रसिध्द झाले आणि प्रवासवर्णनाला आशय अभिव्यक्ती अशी दोन्ही अंगानी एक नवी कलाटणी मिळाली.

**Title :** *मराठी प्रवासवर्णनाचे स्वरूप आणि वाटचाल*
**Source:Indian Streams Research Journal [2230-7850]** *संदीप सांगळे* **yr:2013 vol:2 iss:12**

अनुभवांची कलात्मक मांडणी, अभिजात विनोदी वृत्ती, रेखीव शब्दचित्रे आणि लेखकांच्या रसिल्या समृध्द व्यक्तीमत्वाचे घडणारे प्रसन्न खेळकर दर्शन ही या प्रवासवर्णनाची वैशिष्टये होत. याशिवाय 'आमची माती आमचे आकाश', 'निळे डोंगर तांबडी माती', ही त्यांची आणखी दाने प्रवासवर्णने होत. काणेकरांच्या 'खडक कोरतात आकाश, (1964) या शेवटच्या प्रवासवर्णनाने प्रवासवर्णनांना अधिक रमणिय रूप दिले.

श्री. रा. टिकेकर यांचे – 'मुसलमानी मुलाखाची मुशाफिरी', गो.नि. दांडेकरांचे–'नमेदेच्या तटाकी', रा.भि.जोशी यांचे 'वाटचाल, 'मजल दरमजल, गंगाधर गाडगीळांचे–'गोपुरांच्या प्रदेशात', 'साता समुद्रापलिकडे', प्रभाकर पाध्येंचे – 'अगस्तिच्या अंगणात', 'तोकोनामा', बाळा गाडगीळ – 'सिगरेट आणि वसंतऋतू', सौ. कमल फडकेंचे 'ऊटकमंडची यात्रा', डॉ. वसंत अवचारे– 'लाल नदी निळे डोंगर', दि.बा. मोकाशी –'पालखी', प्र. के. अत्रे– 'भ्रमंती', पु.ल. देशपांडे – 'अपूर्वाई', 'पूर्वरंग', वंगचित्रे', अणाभाऊ साठेंचे', 'माझा रशियाचा प्रवास', लक्ष्मण गायकवाड यांचे 'चिनी मातीतील दिवस' इत्यादी प्रवासवर्णनांनी मराठी प्रवासवर्णनाचा प्रांत समृध्द केला.

1980 नंतरच्या कालखंडात बालशंकर देशपांडे – 'कल्पद्रुमांच्या प्रदेशात', कमला वाघ – 'सुभग सुभग ते दक्षिण देश', मधुकर केचे – 'भटकंती', मीना देशपांडे–'पश्चिम गंधा', बाबा भांड – लागेबांधे', माधव गडकरी – 'असा हा गोमांतक', मीना प्रभू – 'माझे लंडन', इत्यादी प्रवासवर्णने महत्वपूर्ण अशी आहेत. ज्यांची नोंद करता येणार नाही. अशा विपूल प्रमाणात मराठीत प्रवासवर्णने लिहिली जात आहेत. त्यामुळे मराठीतील 'प्रवासवर्णन' हे ललितगद्य वाड्मयाचे दालन समृध्द होत जाणारे आहे. त्यामुळे उज्वल भवितव्य असणारा वाड्मयप्रकार म्हणून प्रवासवर्णनाची आपल्याला दखल घ्यावी लागणार आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रवासवर्णनेही अधिक वाचनिय आणि समृध्द अशी होती त्यामुळे त्या कालखंडातील प्रवासवर्णनांनी मराठीतील प्रवासवर्णनांचा प्रांत अधिक गतीमान आणि प्रवाही करण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. स्वातंत्र्यपूर्व ते स्वातंत्र्योत्तर हा कालखंड पाहता वैविध्यपूर्ण प्रवासावर्णने वाचकांच्या हाती पडली आणि एक समृध्द वाड्मयप्रकार म्हणून प्रवासवर्णनांकडे पाहिले जाऊ लागले. विविध मान्यवर लेखकांनी आपापल्या परीने प्रवासवर्णनांची निर्मीती करून या वाड्मयप्रकाराला प्रतिष्ठा मिळून दिली. त्यातील काही ठळक प्रवासवर्णने पुढील प्रमाणे– नाना नारायण यांचे 'इंग्लड देशाचे वर्णन, (1835), शामराव मोरोजी –'काशीप्रवास' (1852), भास्कर हरी भगवत – 'इंग्लडातील प्रवास' (1867), यशवंतराव उदास – 'पुणे वर्णन' (1868), मुंबई वर्णन, (1869), हरी गणेश पटवर्धन – 'काशीयात्रा' (1782), पंडीता रमाबाई –'इंग्लडचा प्रवास' पार्वतीबाई चिटणवीस– 'आमचा जागाचा प्रवास' (1915), गो.चि.भाटे – 'माझा म्हैसुरचा प्रवास' (1928), पांडुरंग गुणे – 'माझा युरोपातील प्रवास' (1915), काका कालेलकर – 'लोकमाता' (1938), प्रभाकर पाध्ये – 'लोकान्तेमा' (1961), ग.प्र. प्रधान –'हाजीपिर' (1966), वसंत बापट 'बारा गावचं पाणी' (1966), इंदुमती शेवडे – 'इथे साहेबाचिये नगरी' दिलीप चित्रे – 'शिबा राणीच्या शोधात' (1971) रविंद्र केळेकर – 'जपान जसा दिसला' (1970), डॉ. एन.जे. सोनवणे – 'जपान गाथा', प्रभाकर ताम्हणे – 'हिमफुलांच्या देशात' (1972), रविंद्र पिंगे – 'आनंदाच्या काही दिशा' (1974), ग.दि. माडगुळकर – 'कलावंताचे आनंद पर्यटन' (1977), व्यंकटेश माडगुळकर – 'पांढरी मेंढरे हिरवी कुरणे' (1979), चारूशिला गुप्ते – 'बर्फाच्या दुनियेत', मीना देशपांडे – ' पश्चिम गंगा', रमेश मंत्री – 'सुखाचे दिवस', लिला देशपांडे – हिमालयाचा स्पर्श', निवृत्ती वडगावकर – 'फेरफटका', आनंद पाटील – 'पाटलाची लंडनवारी' इत्यादी नानाविध प्रवासवर्णनांनी मराठी वाड्मय प्रकारास समृध्द करण्यासाठी मौलिक भुमिका बजावली.

### *प्रवासवर्णन वाड्मय निर्मितीमागील प्रेरणा –*

प्रवासवर्णन वाड्मयप्रकार विकसित होण्यासाठी महत्वाचे कारण म्हणजे पाश्चात्य राज्यकर्त्यांचा आपल्याशी आलेला संबंध अनेक अर्थाने प्रेरणादायी ठरला. त्यांच्या प्रागतीक दृष्टीकोनाने भारतात रस्ते, लोहमार्ग, जलमार्ग, आकाशमार्ग, जहाजे, आगबोटी, विमाने त्याचबरोबर तारायंत्र, मुद्रणाकला, शिक्षण यांसारख्या भौतिक व पायाभुत सुविधा निर्माण झाल्या. त्यामुळे पाश्चात्यांच्या संस्कृतीचे वेगळेच दर्शन भारतीयांना घडले. साहजिकच मुळचा कष्टाचा असणारा प्रवास बराच सुलभ व सुखाचा झाला.

अर्वाचिन कालामध्ये भारतीयांची प्रवासविषयक भुमिका अधिक, सुक्ष्म व्यापक आणि वस्तुनिष्ठ होत गेलेली दिसते. पाश्चात्य संस्कृतीने निर्मिलेल्या प्रवासविषयक साधानातील सुलभता व सुखसोई पाहून प्रवासाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलुन गेला. स्वातंत्र्योत्तर काळात तर प्रवास हा दैनंदिन जावनाचा आवश्यक भाग झाला. त्याला सौंदर्यदृष्टीची व रसिकतेची जोड मिळाल्याने प्राचीन काळापेक्षा अर्वाचिन काळात 'प्रवास' ही लेखनामागील प्रमुख प्रेरणा ठरली.

### *ज्ञानदानाची व ज्ञानग्रहणाची प्रेरणा –*

इ.स. 1800 पासुन इंग्रज या भूमीवर हळूहळू व्यापारानिमीत्ताने आले. त्यांच्या कर्तृत्वाचा अभ्यास म्हणजे भारतीय मनाला ज्ञानलालसा होती. शिळाप्रेसमध्ये छापलेले श्री. नाना नारायण यांचे 'इंग्लड देशाचे वर्णन', मुंबई (इ.स. 1835) तसेच श्री. करसनदास मुळजी यांचे 'इंग्लडातील प्रवास' (इ.स. 1867) इ. ग्रंथांमधून प्रवासवृत्तांताचे हेतू पाहिल्यास या प्रवासलेखनामागे ज्ञानदानाची व ज्ञानग्रहणाचीच प्रेरणा दिसेल. प्राचीन मराठी साहित्यात 'ऋध्दिपूरवर्णन' सारखे लेखन धार्मिक किंवा अध्यात्मिक प्रेरणेतून निर्माण झालेली दिसते. तर नंतरचा कालखंड हा मुळी राष्ट्रीय उत्थानाचा प्रबोधनाचा कालखंड मानला जातो म्हणूनच पर्यटनाद्वारे समज प्रबोधन हा हेतू त्यात स्वच्छ दिसतो.

### *भाषांतराची प्रेरणा –*

प्रवासवर्णनवर वांड्यम निर्मितीमागील भाशांतराची प्रेरणा ही पूर्वीपासून आजवर चालत आलेली एक महत्वाची प्रेरणा आहे. उदा. 'इग्लडातील प्रवास' हा प्रख्यात ग्रंथ भा.ह. भागवतांनी मुळ गुजराथीवरून भाषांतरीत केलेले मराठीतील प्रवासलेखनात खूप मोलाची भर पडलेली दिसते. ते झुंजार प्रवासी', ले फ्रान्सीस पार्कमन, अनुवाद मंगेश पाडगावकर (1964) भाषांतराच्या प्रेरणेतून परकिय भाशेतून उपलब्ध झालेली प्रवासवर्णने आपल्या भाषेत आणल्याची प्रतिती वरील ग्रंथावरून येते.

### *नियतकालिके व मासिकामधून मिळालेल्या प्रेरणा–*

वर्तमानपत्र किंवा मासिकांच्या संपादकांनी लिहायला प्रवृत्त केले म्हणूनही प्रवासलेखन घडलेले आहे. प्रवासलेखनाला खास जागा देऊन छापणे, छापलेल्या लेखांचे पुढे पुस्तक तयार होणे या प्रकारच्या वाड्मय निर्मितीत नियतकालिकांचा फार मोठा वाटा होता आणि आहे. उदा. किर्लोस्कर मासिकांचे संपादक शंतनुराव किर्लोस्कर, सत्याकथेचे संपादक वि.पु. भागवत, केसरीचे संपादक न.चिं. केळकर इत्यादी. पु.ल. देशपांडे यांची 'अपूर्वाई' व 'पूर्वरंग' ही प्रवासवर्णने व प्रा. अनंत कालेकरांचे 'धुक्यातून लाल तान्याकडे' हे प्रख्यात प्रवासवर्णन प्रथमतः पत्ररूपाने 'किर्लोस्कर मासिकात क्रमशः अवतरले. हिंदुस्थानाचा किनारा सोडल्यावर रशियातून परत वाटेला लागेपर्यंत कानेकरांनी तिकडून पाठविलेली वर्णने 'किर्लोस्कर मासिकातून' त्यासालीच प्रसिध्द झाली. याचाच अर्थ नियतकालिके, मासिके, वर्तमानपत्रे, निश्चित प्रमाणात प्रवासलेखन

करण्यासाठी उद्युक्त करतात. प्रेरणा देतात.

एकूणच वरील सर्व प्रेरणांचा विचार करता आपल्या लेखनाचा कुणीतरी वाचक किंवा रसिक आहे. याची जाण लेखकांच्या मनातही निर्माण झालेली दिसते. लेखक आणि वाचक यांचा हृदयसंवाद साधुन लेखकाने लिहिलेले प्रवासवर्णन वाचकांपर्यंत पोहचवायचे काम प्रसारमाध्यमांनी प्रभावीपणे केलेले दिसते. इ.स. 1950 ते 1935 व इ.स. 1966 ते 1980 या कालखंडात प्रवासवर्णन हा वाड्मयप्रकार वरील प्रेरणांमुळे बहरला. त्याच्या अस्मितादर्शक रूपाकडे पाहिल्यास तो वेगळा ललितवाड्मयप्रकार आहे यांची रसिकाला कबुली देणेच भाग पडते. अर्वाचिन कालखंडातच हा वांड्मय प्रकार बहरलेला दिसतो.

### *प्रवासवर्णची ठळक वैशिटये–*

1.प्रवासवर्णनपर वांड्मयनिर्मीतीही वास्तवाशी अधिक निगडीत असते. हा प्रवासी लेखक प्रत्यक्ष प्रवास करून आपले अनुभव लिहित असतो. काही लेखक प्रवासात रोजनिशीचा, माहितीच्या टिपणांचा उपयोग करतात त्यामुळे प्रत्यक्ष लेखन करताना त्या त्यावेळच्या लेखकाच्या मनाचे आणि मनावर झालेल्या प्रवासाचे ताजे संस्कार वाचकालाही अनुभवायाला मिळतात. त्यामुळे वाचकाला त्यात एकप्रकारचा गोडवा मिळतो.
2.प्रवासवर्णनकाराच्या लेखननिर्मितीत त्याचे संवेदनक्षम मन, त्याची निरीक्षणशक्ती, तीव्र स्मरणशक्ती आणि उत्कटता यांना मोठे आव्हान असते. कारण एकाच वेळी भावलेले, धावत्याक्षणी प्रवासात पाहिलेले आवडणे अतिशय महत्वाचे असते. तसेच ते आठवून जाणीवेच्या स्तरावर जाऊन उत्कष्टपणे व्यक्त करणे हे एक कौशल्यच असते. कारण प्रवासानंतर आलेला सगळा शीण घालविल्यानंतर लेखकाची बैठक महत्वाची असते.
3.प्रवासवर्णनातून लेखकाचे व्यक्तीमत्वही वाचकाला जवळून अनुभवता येते. कारण प्रवासवर्णनकर्त्यांच्या व्यक्तीमत्वाचे अनेक पदर त्याच्याही नकळत उलगडले जातात. प्रवासी लेखक त्याच्या आवडीनिवडी, सवयी, दोश, भलेबुरपणा, प्रवासवर्णनामुळे वाचकाला कळतो. आणि समाजातील इतर माणसांसारखाच एक माणुस म्हणून त्याचे वाचकाला दर्शन घडते. आणि माणसांबध्द्लची जिज्ञासा तृप्त होण्यास मदत होते.
4.प्रवासी लेखकाला प्रवासात एखदा प्रवासी, सोबती किंवा इतरही अनेक विभिन्न स्वभावांची माणसे भेटतात त्यामुळे त्यांच्या स्वभावाचे दर्शन येथे सहजरित्या होत असते. प्रा. वा.ल. कुलकर्णी म्हणतात, ''प्रवासचित्रणात्मक लेखनात जर विशेश जीवंतपणा कशाने येत असेल तर तो त्यातुन अगदी सहजगत्या घडणाऱ्या मनुष्यस्वभावाच्या विविध दर्शनाने.''
5.प्रवासवर्णनात मानवीजीवनाचे जे चित्र येते जे जरी धावते असले तरी त्यातुन त्या प्रदेशाचे, तेथील समाज जीवनाचे विशेष घेऊन अवतरणे आणि मानवी स्वभावाचे दर्शन घडविण्याचे काम इतर वाड्मयप्रमाराप्रमाणेच घडत असते. खरे म्हणजे माणुस हेच जगातले सर्वात मोठे आश्चर्य आहे. या आश्चर्याचा शोध प्रवासवर्णनातही लागु शकतो. आणि त्याबद्दलचे वाचकांचे कुतूहल प्रवासवर्णने पुरे करू शकतात.

### *प्रवासवर्णनाची लेखन शैली –*

प्रवासवर्णन या वाड्मय प्रकारात लेखनशैलीलाही विशेश महत्व आहे. प्राचीन मराठी वाड्मयामध्ये जी प्रवासवर्णने आहेत ती प्रामुख्याने पद्यमय शैलीचा आधार घेऊन लिहिली गेली आहेत. अर्वाचिन प्रवासवर्णनांकडे वळतांना मात्र लेखनपध्दतीत आमुलाग्र बदल झाल्याचे दिसते. ही लेखनशैली गद्याचा आश्रय घेते  गद्य निवेदनाला सोईचे तसेच आत्माविश्काराला जवळचे आहे. प्रत्येक प्रवासवर्णनकाराची स्वतःची अशी शैली असल्याने प्रवासवर्णनातील प्रत्येक प्रसंग, घटना, व्यक्ती, प्रदेश किंवा स्थळ यांची शब्दचित्रे वेगवेगळी वाटतात. उदा. उर्मिला पवार यांच्या 'मॉरिशस एक प्रवास' मधील लेखनशैली वेधक आणि वाचनीय आहे. त्यांच्या लेखनात अनेक ठिकाणी काव्याची उधळण झालेली दिसते. त्यांनी आपल्या लेखनात वापरलेल्या प्रतिमा, प्रतिके आणि उपमा या वाचकाला भावणाऱ्या अशा आहेत. त्यामुळे त्याचं प्रवासवर्णन ललित गद्याचे रूप घेताना दिसते. त्यामुळे वाचकाला एकाच प्रवासपर्णनाबरोबरच चांगल्या ललित कलाकृतीचा आनंद मिळतो. प्रवासवर्णनकारांची लेचनशैली एकाच वेळी निबंधकाराची, कथाकाराची, कवीची, व्यक्तीचित्रण करण्याची, आत्मचरित्रकाराची, निसर्गचित्रकाराची, भाश्यकाराची असते.

### *समारोप –*

अण्णाभाऊ साठेंनी 'माझा रशियाचा प्रवास' या आपल्या प्रवासवर्णनात, 'रशियात मी नवी सृष्टी पाहिली, एक नवा समाज पाहिला समाजवादाच्या सावलीत वाढलेली मुलं नि फुलं पाहिली, जर मी सोविएत देश पाहिला नसता तर माझ्या जीवनात एक फारमोठी पोकळी राहून गेली असती'. असे रशीयाच्या प्रवासासविषयी लिहुन ठेवले आहे. यावरून प्रवासवर्णनाचे महत्व आपल्या लक्षात येते. माणुस प्रवासाने समृध्द होतो. त्याच्या जाणीवा विकसित होतात. नवजग आणि नव जीवन पाहुन त्याच्यातील न्युनगंड दूर होतो. त्याच्या ज्ञानाला नवी झळाळी मिळते. त्याच्या आकलनाचं वर्तुळ विस्तारतं. माणुस आणि निसर्गाचं अथांग दर्शन केवळ प्रवासामुळेच शक्य होते. प्रवासातील माणसांचे जगणं आणि वागणं समजून घेण्यासाठी प्रवासवर्णन हा वाड्मय प्रकार जाणून घेणे अतिशय महत्वाचे वाटते. म्हणूनच मराठी वाड्मयाच्या समृध्द वाटचालीमध्ये प्रवासवर्णन हा वाड्मयप्रकार निश्चितच मैलाचा दगड ठरावा ही अपेक्षा!

संदर्भग्रंथ

1) 'प्रवासवर्णन एक वाड्मय प्रकार' – वसंत सावंत, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई.
2) 'हिमालयातील प्रवास' – काका कालेकर (अनु. भाऊ धर्माधिकारी, पुणे)
3) 'वाटचाल' – वा.ल. कुलकर्णी, मुंबई, 1956
4) 'साहित्याचे मानदंड' – गंगाधर गाडगीळ, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1962.
5) 'वाड्मयीन संज्ञा आणि संकल्पना कोश' – जी आर. भटकळ.
6) 'जागतिकीकरण आणि मराठी साहित्य' – संपादक – डॉ. शरद गायकवाड स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.